**अमरावती महानगरपालिका ,अमरावती**

**दिनांक १२.१.२०२४ रोजीचा प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १५२ -** अमरावती स्थित मौजे - पेठ अमरावती ,ता. जि. अमरावती येथील शेत स. नं १८९/४ मधील क्षेत्रफल २ हे ०२ आर जागेवरील वि.यो. आरक्षण क्र ४७८ निलकंठ व्यायाम मंडळाच्या खेळाच्या मैदानाचा विस्ताराची जागा वगळून रहिवासी वापर क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्रमांक १५२ -** अमरावती स्थित मौजे-पेठ अमरावती,ता.जि. अमरावती येथील शेत स.नं १८९/४ मधील क्षेत्रफल २ हे ०२ आर हि खाजगी मालकीची आहे. अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु) नुसार सदर जागा वि.यो.आरक्षण क्र.४७८ निलकंठ व्यायाम मंडळाच्या खेळाच्या मैदानाचा विस्तार दर्शविलेली आहे. मौजे-पेठ अमरावती ,येथिल शेत स.नं १८९/४ मधील क्षेत्रफल २ हे ०२ आर जागेवरील वि.यो आरक्षण क्र.४७८ निलकंठ व्यायाम मंडळाच्या खेळाच्या मैदानाचा विस्ताराची जागा वगळून रहिवासी वापर क्षेत्रात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापी सदर समिती सद्य:स्थितीत कार्यरत नसल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार प्राधिकरणाचे सर्व अधिकार प्रशासन यांचेकडे असल्याने सदर प्रस्ताव मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३७ नुसार नागरिकांचे हरकती व सूचना नोंदवुन त्याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव तयार करून अंतिम ठराव पुन्हा मान्यतेकरीता नियोजन प्राधिकरणाकडे न पाठवता सरळ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचे अधिकारही प्रशासनास देण्यात यावे. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.१२/०१/२०२४ ला मान्यता प्रदान केली आहे.

अर्जदार यांनी दि.०३/०१/२०२४ रोजी या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे. उपरोक्त प्रशासकीय विषय शहर सुधार समितीच्या मंजरीस्तव सादर करण्यात आला आहे.परंतु सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा व विषय समित्या अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगर सचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.